# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता.

**प्रा. आशिष ताजराम रंगारी.**
सहाय्यक प्राध्यापक
एस. चंद्रा महिला महाविद्यालय
सडक / अर्जुनी जि. गोंदिया.

**सारांश** —

स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळात नवनव्या जाणिवेतून जे साहित्य उदयाला आले त्यामुळे मराठी साहित्य समृध्द झालेले दिसुन येते. शिक्षणाचे जाळे जसजसे विणत गेले. तसतसे हा समाज जागा होवून बोलू व लिहू लागला. प्रत्येकामध्ये आपापले अनुभव व्यक्त करण्याची जणू स्पर्धाच होती. इथल्या व्यवस्थेने अस्पृश्य समाजातील माणसांना पशूपेक्षाही हीन लेखण्याचे कार्य केले. त्यामुळे त्यांच्या जगण्याला अर्थच प्राप्त झालेला नव्हता म्हणूनच त्यांच्या वेदनेतून, त्यांचा स्वर, वेदना व विद्रोह लेखनातून प्रगट होऊ लागला. आंबेडकरवादी लेखक, कवी प्रमाणे आंबेडकरवादी कवयित्रीही तितक्याच जोमाने लिहू लागल्या आहेत. पुरोगामी विचार पेरण्याची क्षमता या कवयित्रीमध्ये दिसून येते. भलेही यांचे साहित्य कमी अधिक प्रमाणात असेल तरी देखील ते तितकेच महत्वाचे ठरते. साहित्यक्षेत्रात आपली नवी ओळख निर्माण करू पाहत आहेत, हे उल्लेखनीय आहे. आंबेडकरवादी कविता ही तरूण, संवेदनशिल मनाची कविता आहे. ती नवे जीवन जगू पाहत आहे. कठोर, दाहक वास्तवाचे चिंतन हे काव्य करते. अन्याय अत्याचार करणाऱ्यावरही आगही पाखडते. डॉ. आंबेडकर, फुले, यांनी मानवी मूल्याची प्रतिष्ठा, जीवनमूल्याचा जाहिरनामा मांडले. माणूसकी, मानवीमूल्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानले. हेच मूल्य प्रस्थापित करण्यावर भर आहे. त्यांची कविता संघर्षाला सामोरी जाणारी, प्रस्थापित मूल्ये उधळून लावणारी आणि माणूस म्हणून प्रत्येकाला जगण्याचा हक्क मिळवू पाहणारी लढावू वृत्तीची कविता आहे.

**प्रास्ताविक** :—

म. फुले, कबीर, बुद्ध, डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित समाजाने सूर्यप्रकाशाच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रारंभ केला. डॉ. आंबेडकराचे विचाराने प्रेरित होऊन समाजातील लोकांनी आपले साहित्य निर्माण करून एक नवी ओळख निर्माण करून आंबेडकरी साहित्ययुगात आपले वेगळे स्थान प्रस्थापित केले. आपल्या साहित्यातून फुले, आंबेडकरी विचार कानाकोपऱ्यात पेरण्यासाठी कथा, कांदबरी, शाहिरी, पोवाडे, गीत, कविता या साहित्य प्रकाराचा उगम झाला यात प्रचंड यश आले. आपले दु:ख आपल्या वेदना मांडण्यासाठी दलित साहित्यात असलेला महत्वाचा भाग म्हणजे दलित कविता हा होय. आपले दु:ख व वेदना जगापुढे आणण्यासाठी आम्हीही माणसे आहोत माणूस म्हणून जगू द्या. अधिकार द्या, न्याय हक्कासाठी लढा दिला. दलित कविता हा साहित्य प्रकार प्रभावी वाटला. त्यातून कवी उदयास आले. त्यांनी आपले स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण केले.

आंबेडकरी विचार कवितेतून चीड व्यक्त होताना दिसून येते. ती एका विशिष्ट समूहाबद्दल नाही तर जिथे जिथे अन्याय, अत्याचार घडतो विषमता दिसून येते त्या उपेक्षित समूहाबद्दल आपला राग ती व्यक्त करते, समूहाच्या वेदनेची प्रतिक्रिया व्यक्त करते. ती वेदनेचे कविता ठरते. तिला समाजातील

अंधश्रद्धा, उपेक्षा, संकुचितपणा, विषमता, अत्याचार, जातीभेद नष्ट करून त्या ठिकाणी स्वातंत्र्य, समता, बंधुता, व न्याय प्रस्थापित करावयाचा आहे त्यासाठी ते सतत धडपड आहेत. प्रतिगामी विचाराविरूद्ध उभे राहण्याची शक्ती प्रदान करते. ते सत्य (मांडण्याचे धाडस करून) मांडूनच थांबत नाही तर ते रूजविण्याचे प्रयत्न करते.

ज्याच्यामुळे दलित माणूस माणसात आला. त्याच्या ठिकाणी आत्मविश्वास, स्वाभिमान निर्माण केले. ज्याच्यामुळे म. फुले, कबीर, बुध्द कळले ते म्हणजे डॉ. बाबसाहेब आंबेडकर ! हेच खरे दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. त्याच्यापासून प्रेरणा घेऊन लेखक, कवी, नाटककार निर्माण झालेत, दलित कवी लिहू लागले. कवितासंग्रह निघू लागले. आंबेडकरी विचाराने प्रेरित होऊन स्त्रीया देखील आपल्या कवितेच्या माध्यमातून दलित कवी प्रमाणेच लिहू लागल्या. म. फुले, बुद्ध, आंबेडकरी विचार समाज सुधारणेसाठी प्रेरणादायी ठरले सुशिक्षित स्त्री वर्गाने स्त्री वर्गावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव इतर समाजातील वर्गाला व्हावी या उद्देशाने लेखणी हातात घेऊन कवयित्री, लेखिका म्हणून पुढे आल्या. येथे रूजविल्या गेलेल्या वर्णव्यवस्थेमुळे स्त्रीयांचे हक्क हिरावले गेले होते. स्त्रीयांना चूल आणि मूल इतकेच काय ते अधिकार असल्याने त्यांची पिडवणूक होत गेली. त्यांना हीन लेखले गेले. अधिकार काढले गेल्याने त्यांची हुशारी, शौर्य, कला, विचार, हिंमत ही पुरल्या गेल्याने याचा परिणाम कुटुंब व्यवस्थेवर, समाजावर, झाला.

म. फुल्यांनी सावित्रीला मातीची पाटीकरून अक्षरे गिरविण्यास शिकविले त्याच सावित्रीने पुढे शिक्षणक्षेत्रात क्रांती घडवून आणली. शिक्षणाचे महत्व पटवून देऊ लागली. सावित्री लिहू लागली व पहिल्या वैचारिक कवयित्री ठरल्या. त्यांनी अनेक विषय हाताळले शिक्षण नाकारल्यामुळे जी देशाची हानी झाली ती खूप मोठी होती. कवयित्री सावित्रीबाई फुले आपल्या श्रेष्ठधन कवितेत म्हणतात.....

“ विद्या हे धन आहे रे ! श्रेष्ठ साऱ्या धनाहून
तिचा साठा जयापाशी ! ज्ञानी तो मानती जन”

जो ज्ञानी, हुशार व्यक्ती असतो त्याला समाज मान प्रतिष्ठा सन्मान देत असते. पैशापेक्षा विद्या हेच श्रेष्ठ ठरते असा विचार सावित्रीवाईनेच दिला. त्याकाळी समाजात अंधश्रद्धा फार मोठ्या प्रमाणात फोफावत होती. नवस या कवितूतून अंधश्रद्धेवर प्रहार करताना त्या म्हणतात.

धोंडे मुले देती ! नवसा पावती
लग्न का करती ! नारी नर

आजही अंधश्रद्धा समाजात दिसून येते. लोक अंधश्रद्धेला बळी पडताना दिसून येतात. बुवाबाजीला बळी पडतात. फसविले जातात. लुबाडले जातात. नवस केल्याने मुले होत नसतात धोंडयानी (दगड्याच्या देवान) जर मुले बाळे होत असतील तर नारी – नराने लग्न केले नसते. असा वैचारिं विवेकवादी, विज्ञानवादी विचार सावित्रीबाईने व्यक्त केलेला दिसून येतो. माणसाने कसे वागावे या संदर्भात सावित्रीबाईनी साध्या सोप्या सरळ शब्दातून तयास मानव म्हणवे का ? या कवितेतून विचार व्यक्त करताना त्या म्हणतात.

दे रे हरी पलंगी काही,
पशुही ऐसे बोलत नाही,
विचार ना आचार नाही
तयास मानव म्हणावे का ?

माणसाने कसे वागावे याचे जणू दिग्दर्शनच केलेले दिसून येते. अतिशय उत्तम अशी ही कविता कवितेचे विषय कसे असावे जणू याचा आदर्श सावित्रीबाईनी आपल्या काव्यफुले संग्रहातून घालून दिलेला दिसून येतो.

बाबासाहेबांनी म. फुले, कबीर, व बुद्ध यांना गुरू मानले. आपल्या समाजाची प्रगती व्हावी. गुलामगिरीतून मुक्तता व्हावी. अज्ञानातून, दारिद्रयातून बाहेर यावे यासाठी ते आंदोलन, चळवळी करीत होते. तरूण वर्ग त्यांना साथ देत होता. दु:खातून विद्रोहाची ठिणगी पडली, व त्यातूनच समाज पेटून उभा राहिला. स्त्रीयांनी आपल्या वेदना दु:ख मांडण्यास सुरूवात केली. अंधश्रद्धा रूढी परंपरा यांना नकार दिला. या करीता डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेच्या अधिकरातून हे बळ प्राप्त केले. डॉ. आंबेडकरांनी केवळ एका जातीतील स्त्रीयासाठी नव्हे तर संपूर्ण भारतातील स्त्रीयांसाठी अधिकार मिळवून दिले. त्यामुळे त्याचे ऋण फेडण्याची जी संधी मिळाली त्या संधीचा वापर त्यांनी लेखनीला हत्यार बनवून केला व आपले वेगळेपण निर्माण केले आंबेडकरी विचार पुढे न्यायचा असेल तर शिक्षण घेतले पाहिजे. त्याशिवाय पर्याय नाही. प्रतिभा आहिरे या कवयित्री असं कसं म्हणावं ? या कवितेत ते म्हणतात.

आता विद्रोहानं इथं एखाद मन पेटून उठेल
असं कसं म्हणावं ?
ह्या मुर्दाड वस्तीत आपल्यांच्या
कुणी जिवंत माणूस भेटेल असं कसं म्हणावं ?

स्वातंत्र्यात सुद्धा दलित जातीच्या लोकांना स्त्रीयांना स्वातंत्र्यपूर्णपणे मिळालेला नाही. आजही गावोगावी, शहरात अत्याचाराच्या कथा सुरूच आहेत. या अत्याचाराविरूद्ध समाज पेटून का उठत नाही. क्रांती का करत नाही. दलित माणसाचा निळा रक्त इतका थंडा पडला कसा ? असा प्रश्न तिला पडतो. आणि म्हणूनच त्याच कवितेत पुढे म्हणतात......

अन् असं म्हणू नये तर कसं म्हणावं ?
आपल्या आभाळाची सारी निळाई
दिवसेंदिवस कुठं हातात तर कुठं भगव्यात शिरतीय
आपली परिवर्तनसाठीची लढाई
जन्मण्यापूर्वीच गर्भातच मरतीय.
क्रांती अन् संघर्ष नुसतेच वाट्टेल तिथं लोळावताहेत.

डॉ. बाबसाहेबांच्या महापरिनिर्वाणा नंतर चळवळीतून क्रांती हळूहळू निर्वाण पावू लागली. माणसं हळूहळू विखुरल्या जावू लागली. खंभीर नेतृत्वच नसल्याने विद्रोहाची प्रखरता कमी होवू लागली यांचे शल्य कवयित्रिला आहे. माणसं, सत्तेसाठी, पदासाठी, स्वत:च्या स्वार्था साठी वेगवेगळया चुली मांडू लागले. यामुळेच समाजाचे मोठे अहित /नुकसान झाले. परिवर्तनाच्या लढाईला जोरच राहीला नाही. त्यांना गर्भातच मारले जावू लागले. आपल्याच माणसांना आपल्या विरूद्ध उभे करू लागले, मारू लागले. म्हणून त्या पुढे म्हणतात...

‘‘ ज्यांना त्यांच्या मरणाचं सुतक नाही ते,
आपल्याच बापासाठी गाताहेत,
अन् सगळीकडे फक्त

IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

राहुट्या तंबू अन् निरनिराळया गटाचे झेंडे
वाढताहेत
दररोज नवे नेते प्रायव्हेट लिमिटेड काढताहेत''

प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांनी /समाजाने जो छळ केला, अत्याचार, पिळवणुक, शोषण केले. माणसे मारलीत, झगडे लावलेत, त्याच्यात राहूट्यात, तंबूत मेंढरे बनून कसे राहू लागले याचे दु:ख कवयित्रीला झालेले दिसते. दररोज नवी कंपनी उभी राहावी तसे निरनिराळ्या गटाच्या कंपन्या तयार होऊ लागल्या. एखाद्या वेळेस अन्याय झाला की, या कंपन्या आपले आपले झेंडे घेऊन रस्त्यावर येतात आपल्या सोयीनुसार शक्तीपणाला लावतात. एक, दोन दिवस चर्चा घडते पण न्याय मिळत नाही. एकत्र येत नाही इथल्या संस्कृतीने स्त्रीयांना नेहमीच गुलाम बनविले. त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले धर्म व शास्त्राचा धाक दाखवून त्यांचा छळ केला जाते. प्रा. प्रतिभा अहिरे या कवयित्री माझ्या देशात या कवितेत म्हणतात...

सूर्याचे दरवाजे आमच्यासाठी उघडे टकण्याची प्रथा
केव्हाही नव्हती माझ्या देशात
परंपरेनेच घातलं जाई काळोखाचं काजळ.
आमच्या डोळ्यात

आज गावत, राज्यात, देशात कुणीही सुरक्षित नाही. घराबाहेर पडले की सुखरूप घरी परत येई पावतो जीवाची शाश्वती नसते. निस्वार्थी नेते, सच्चे कार्यकर्ते, चळवळीचे पुढारी यांचे विरोधक खूप असतात. प्रतिगामी विचार हा पुढे येतो. स्वार्थासाठी पैशासाठी स्पर्धेत माणसेच माणसाचे (समाजाचे) वैरी बनतात. म्हणूनच उषा हिंगोणेकर 'आता' या कवितेत म्हणतात...

रस्त्या – रस्त्यावर ;
छुपे हल्लेखोर दबा धरून आहेत,
पावलागणिक सुरंग,
पेरलेले आहेत.
कुठल्याही क्षणी
आपण उद्ध्वस्त होऊ शकतो.
हे ओळखूनच दोस्तहो !
आता रस्त्यावर यावे लागेल.

आज देखील मनूवादी विचारसरणी ही छुप्या मार्गानेच हल्ले करीत आहे. चळवळीतील लोकांमध्ये भांडणे लावून ती चळवळ उध्वस्त करीत असते. आता ही कविता वास्तविकतेला जवळ जाणारी आहे. नरेंद्र दाभोळकर, गौरी लंकेश यांच्या हत्या म्हणजे चळवळीच्या विचाराची हत्याच होय प्रतिगामी विचारसरणी चे नवे सूत्र अवलंबिलेले दिसून येते ते म्हणजे प्रमुख व्यक्तीची हत्या करणे हे होय. व्यक्ती संपला की चळवळ, विचार व कार्यकर्ते उध्वस्त होतात. हे घडू नये याकरीता माणसांना रस्त्यावर आता उतरल्या शिवाय पर्याय नाही असा मौलिक विचार त्या व्यक्त करतात.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी मुक्तिलढ्यापासुन सुरूवात केली ती महाडच्या चवदार तळयापासूनच म्हणून दलित/आंबेडकरवादी कवीनी या लढयाचे लोन कवितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविले कवितेला केंद्र स्थान बनविले. पशुंना, जनावरांना पाणी पिण्याचे अधिकार पण अस्पृश्य माणसाना

पाणी पिण्याचे अधिकार नव्हते ते मिळवून दिले बाबासाहेबांनीच. म्हणूनच हिरा बनसोडे महापुरूष या कवितेत त्या म्हणतात.

जाहीर आहे निसर्ग सर्वांचा आहे
परंतु यांनी तोही खरेदी केलाय
चवदार तळयाच्या थेंबाथेंबावर
चिकटलेत यांच्या नावाचे स्टॅंप
या संस्कृतीचे सजग पहारेकरी
पाण्याला केंद्र करून तळे राखतात
तुझ्या स्पर्शानेही होईल
पाण्याला विषबाधा म्हणून मनात धास्तावतात.

चवदार तळयापासून क्रांतीयुगाची सूरूवात झाली. परिवर्तनाची धार तेजदार झाली. या लढयापासून अस्पृश्यांना दलित वर्गाला नवी दिशा मिळाली. सामाजिक क्रांतीची सुरूवात झाली. सामाजिक विषमतेचे मूळ वर्णव्यवस्थेत दडलेले आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्था बदलली तरी वर्णव्यवस्थेत बदल होणार नाही. त्यामुळे सामाजिक विषमता नष्ट होणार नाही. प्रतिगामी विचारशक्ती ते होऊ देत नाही. म्हणूनच संध्या रंगारी 'कुंपण' या कवितेत म्हणतात.

संस्कृतीच्या काटेरी कुंपणात
माझ्या आयुष्याचे फुल
उमल्यापूर्वीच कुस्करले होत
गरूडासारखी झेप माझी
पण
परंपरागत रूढीनी
पखचं छाटले होते.
दाद मागावी तरी कोणत्या न्यायालयात !
कारण
इथे तर
निरपराध्यांनाच अपराधी म्हणुन
सुळावर लटकवले जात आहे

स्त्री जातीला दुय्यम लेखले जात होते परंपरागत रूढीनी ते लादले गेले. तिच्यावर बंधने घालुन तिला गुलाम बनविले. धर्माचा व शास्त्राचा धाक दाखवून त्यांच्या पंखातील बळच काढून टाकले. दलित स्त्रीयांवर होणारा अन्याय, अत्याचार, हा नित्यचाच भाग होता. दाद मागावी तर कोठे आणि कशी. कारण इथे असत्य जिंकतो, सत्य मरतो. ही व्यवस्था मग विश्वास ठेवायचा तरी कसा,

आज अंधश्रद्धा फोफावत आहे. सुशिक्षित मंडळी देवळापुढं हात जोडतात. समाजात दोन प्रवाह निर्माण होऊ पाहताहेत एक मूर्तिभंजक दुसरा मर्तिपूजक. यात दूसरा प्रवाह हा मोठया प्रमाणावर आहेत देवळापुढं, बाजुला पुजेचे साहित्य विकणारे बाया माणसे असतात. त्याच्या जीवनात सुखही येत नाही. देवाला त्यांची दयाही येत नाही आणि म्हणूनच संध्या रंगारी 'जातं' या कवितेत त्या म्हणतात.

मी मायला इचारलं
माय
तू देवळात कधीच जात न्हाईस
तव्हा माय मनली पोरी
त्या दगडाच्या देवाम्होरं
सारं आयुष्य वाहीलं
तरीबी त्याले पाझर फुटत न्हाई
त्यापरीस माझं जातं बर
ते कधीच चार दाण्याशी बेईमान होत न्हाई

गरीबांचे दु:ख व त्यांची संकटे हा देव कमी करत नाही. दगडाच्या देवापुढं कितीही पूजा अर्चा, नवस, उपास, केली तरी जीवनात फरक पडत नाही. पण माझं जातं तसं नाही वागत चार दाणे टाकले की ते भरडले जाणारच. कष्ट केले की त्याचे फळ मिळते हा विश्वास तिच्यात आहे.

प्रा. प्रज्ञा बडोले यांच्या 'महा बाप सांगे मले' या कवितेतून अतिशय सुंदर मनोगत मांडले गेले. बाप कसा असावा तर तो 'महा बाप सांगे मले' या कवितेतल्या बापासारखा असावा. त्या म्हणतात.......

महा बाप सांगे मले
पळसाले पानं तीन
नको राहूस अडाणी
कर जीवाचं सोन
महा बाप माझा मार्ग
महा बाप माझी दिशा
सदा पासच होण्याने
उंचावल्या त्याच्या आशा
माहया शिक्षणाच्या पायी
बाप शिणला झिजला
त्याने सोताच्या सुखाला
उभा सुरंग लावला.

बाप अज्ञानी अडानी असून पोरीला मोठं करण्याचे स्वप्न तो पाहतो तिच्यात ते सामर्थ्य निर्माण करतो. विश्वास ठेवतो. कष्ट केल्यानेच जीवन सुखी होत असते हा मंत्र देतो. यासाठी तो स्वत: हालअपेष्टा सहन करीत जगत असतो.

दलित कवितेच्या पाठीशी जशी बाबासाहेबांची प्रेरणा आहे तशी गौतम बुद्ध, म. फुले, सावित्रीबाई, रमाई ची ही आहे. बुद्धाचे विचार हे मानवी कल्याण करणारे आहेत. बाबासाहेबामुळेच हे महामानव समजले. आणि म्हणूनच प्रत्येक दलित कवी आपल्या साहित्यकृतीतून त्याचे ऋण फेडण्याची संधी सोडत नाही. मात्र ते विभूतीपूजक बनत नाही. त्याचप्रमाणे कवयित्री सुद्धा ही संधी सोडत नाही. आणि म्हणूनच डॉ. आशा थोरात यांची 'क्रांतीमा'; निलांबरी शिर्के यांची 'मशाल' ही कविता; उषा अंभोरे यांची 'कुंकु रमाई' प्रा. कुमुद पावडे यांच्या एक, दोन, तीन, चार, या कविता याची साक्ष देते.

'शिका, संघटित व्हा , संघर्ष करा' हा बाबासाहेबांनी दिलेला क्रांतीमंत्र होता. समाज शिकला खरा पण समाजापासून दूर गेला. याचे वास्तविक जाण कवयित्री ज्योती लांजेवार यांच्या 'त्यांची बांधिलकी' या कवितेतून व्यक्त केलेली आहे त्या म्हणतात........

त्यांची बांधिलकी आजकाल
संशास्पद वाटते
समाजसेवेच्या गप्पा मारीत
ते मनूसारखे वागतात.......
बाहेर पडण्याची वाट शोधतात
अन्यायाविरूध्द लढण्यापेक्षा
प्रतिष्ठेची टरफल जोपासतात
आजकाल .........
ते त्याच्या लढाईसकट
संशयास्पद वाटतात.

सुशिक्षित वर्ग स्वत:ची प्रतिष्ठा जोपासण्यात धन्यता मानू लागला व अन्याय अत्याचाराविरूद्ध क्रांती करण्यास तो विसरला. सुशिक्षित माणसांनी समाजापासून नाड तोडली. त्याचे वागणे हे संशयास्पद वाटू लागले. अन् समाजावर अनिष्ट ओढवू लागल्याने समाजाची हानी होत गेलेली दिसून येते.

तसेच मुस्लिम स्त्रिंया देखील काव्य रचू लागले मलिका अमर शेख यांचा महानगर हा काव्यसंग्रह, कविता महाजन, नीरजा, प्रभा गणोरकर या सारख्या कवयित्रीच्या कविता देखील या संदर्भात उल्लेखनीय आहेत.

**निष्कर्ष :—**

१. आंबेडकरवादी कवयित्रीची भाषा ही साधी सरळ सोपी पण वैचारिकता सोबत घेऊन जन्माला आलेली दिसून येते. अन्याविरूध्दची चीड ती व्यक्त करते. तिच्यात क्रांतीचे बळ आहे.
२. आंबेडकरावादी कवयित्रीची कविता साहजिकच वेदनेतून निर्माण झालेली आहे. तिची नाळ संत चोखामेळाशी जाऊन मिळते.
३. आंबेडकरवादी कवयित्रीची कवितेची भाषा कधी कधी ठसाळाच्या वाटेवर जाणारी दिसून येते. कधी कधी त्यांच्या कवितेत बोल्डपणाही जाणवतो.
४. आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितेत सुंदर नव्या प्रतिमाचा वापर केला गेल्याचे दिसून येते. सत्य मांडण्याची ताकद तिच्यात आहे.
५. रंजकता, कल्पना यावर तिचा विश्वास नाही. ती यात रमत नाही. समाजात जे घडते त्याचे वास्तव चित्रणाचे प्रतिबिंब काव्यात उमटलेले दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. संपादक सुरेश साबळे, युगाचे हुंदके, संदेश प्रकाशन, प्रकाश भवन बुलढाणा.
२. संपादक, सारनाथ सौदडकर, सावित्रीबाई फुले, समग्र वाङ्मय, श्रेष्ठ धन पृ. ३६, नवस पृ. ३८, तयास मानव म्हणावे का ? पृ. ४३, ४४